● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३८ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४




yuva.aadarsh@gmail.com

RNI: MAHMAR/2019/78282

# युवा आदर्श

https://www.facebook.com/yuvaaadarshnews/

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो. ८३९००९८८८६

बुधवार, दि २८ ऑगस्ट २०२४

https://yuvaadarsh.com

# थकीत कर्जाचे कारण पुढे करुन मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा सन्मान निधी बँकांनी अडविल्यास कारवाई करा

### आमदार बबनराव लोणीकर यांच्या जिल्हाधिकारी जालना यांना सूचना; केवायसीकरिता स्वतंत्र व्यवस्था निर्माण व्हावी

**जालना । प्रतिनिधी -** अनेक पात्र लाभार्थी महिलांना बँकेतील त्यांच्या बचत खात्याची केवायसी झाली नसल्याने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभ मिळत नाही. आणि ज्या महिलांची केवायसी झालेली आहे. आणी ज्या महिलांच्या खात्यात पैसे आले आहेत अशा अनेक महिलांचे पैसे थकीत कर्जाचे कारण देऊन अनेक बँकांनी बचत खाते होल्ड केले आहेत. अशा स्वरूपाच्या अनेक तक्रारी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडे जिल्हाभरातून अनेक महिलांनी केल्याने महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी तातडीने याबाबतीत जिल्हाधिकारी जालना यांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांच्या केवायसी बाबत आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याच्या बाबत पत्राद्वारे सूचना दिल्या आहेत. या पत्रात म्हटले आहे की राज्य शासनाच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या लाडकी बहीण योजनेचे पैसे खात्यात जमा होणे सुरु झाले आहे. मात्र अनेक माता-भगिनींच्या बँक खात्याची केवायसी झालेली नही. केवायसी झाल्याशिवाय खात्यात पैसे जमा होत नाहीत. सध्या बँकेत केवायसी करण्यासाठी हजारो माता-भगिनी बँकेत येत आहेत. भल्या पहाटेपासून बँकेसमोर लांबच लांब रांगा लागत आहेत, तसेच अनेक बँकांकडून थकित कर्जापोटी महीला कडे असलेले बचत गटांचे कर्ज, महामंडळाचे कर्ज, पीक कर्ज असेल अशा महीलांना लाडकी बहिण योजने अंतर्गत अलेले पैसे न देता कपात करत असल्याचे निदर्शनास आले आहे, तसेच बँके मार्फत दररोज पन्नास टोकन देण्यात येत आहे ज्यांच्या कडे टोकन असेल त्यांनी च बँकेत राग लावावी दुसर्यानी थांबायचे नाही असे सांगितले जातं आहे, टोकन घेण्यासाठी सकाळी चार वाजल्यापासून नागरीक व महीला रांगा लावत आहेत, त्यामुळे माता-भगिर्नीना अतोनात त्रासाला सामोरे जावे लागत आहे. दिवसभर थांबूनही केवायसी होत नसल्याने माता-भगिर्नीना निराश होऊन परतावे लागत आहे. दररोज येण्यासाठी आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. माता-भगिनींना केवायसीसाठी होत असलेला त्रास पाहता ही सुविधा ई-सेवा केंद्रावर तसेच बँकेच्या ग्राहक सेवा केंद्रावर देण्यात यावी. बँकेत देखील केवायसीचे काम विनाविलंब होणे आवश्यक आहे. याकरिता बँकेच्या प्रत्येक शाखेत स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्यात यावी. सर्वच बँकेतून माता-भगिनींचे केवायसीचे काम तत्परतेने कसे होईल याबाबत आवश्यक ती उपाययोजना करावी आणि बँकेने खात्याला लावलेले होल्ड काढन्यात यावे



आणि कर्ज असलेल्या महीलाचे पैसे कपात न करता महीलाना ताबडतोब देण्यात यावे. याकरिता आपल्या स्तरावरून जिल्ह्यातील सर्वच बँकांना सुचित करण्यात यावे.

# सणासुदीच्या काळात वीज पुरवठा सुरळीत करा

### माजी राज्यमंत्री अर्जुन खोतकरांनी महावितरण अधिकाऱ्यांच्या बैठकीत सुचना

**जालना । प्रतिनिधी -** शहरासह ग्रामीण भागात गौरी गणपती व ईतर सणासुदीच्या काळात वीज पुरवठा सुरळीत करा अशा सूचना शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी म हावितरणच्या अधिकाऱ्यांना दिल्या. आज २७ ऑगस्ट २०२४ रोजी अर्जुनराव खोतकर यांनी कन्हैयानगर येथील महावितरणच्या अधीक्षक अभियंता श्री सरग यांच्या कार्याला भेट दिली व विजेच्या समस्या संदर्भात अधिकाऱ्यासमोर बैठक घेतली .यावेळी शिवसेना संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर ,जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, महानगरप्रमुख विष्णू भाऊ पाचफुले, योगेश रत्नपारखे सुधाकर वाडेकर यांच्यासह अधीक्षक अभियंता सरग, कार्यकारी अभियंता प्रशांत सोनार, कार्यकारी अभियंता २ मठपती यांच्यासह म हावितरणचे उपअभियंता अधिकार , व शाखा अभियंता गहाणे, नांगरे उपस्थित होते.

या बैठकीत खोतकर यांनी सांगितले की, जालना शहर आणि ग्रामीण भागात विजेची समस्या गंभीर बनली असून तासंतास वीज गायब असते, तक्रार करूनही यामध्ये सुधारणा होत नाही ,आता गौरी गणपती व इतर सणासुदीचे दिवस असून जनतेला या काळात सुरळीत वीज पुरवठा करण्यात यावा.व सण साजरे करता यावे .नसता जनतेच्या रोषाला



सामोरे जाण्यास तयार राहा. असा सज्जड दमच उपस्थित महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिला. तसेच शहरासह ग्राम ीण भागातील लोंबकळत असलेल्या विजेच्या तारा बदलणे व इतर किरकोळ दुरुस्तीचे कामे हाती घेण्यात यावी ,शहरातील नवनवीन वस्त्यांमध्ये वीज विद्युत पोल नाहीत त्यामुळे अक्षरशा जनतेने लाकडी पोलद्वारे वायर टाकून वीज घेतलेली आहे .त्यामुळे आपघात होऊन दुर्घटना होण्याची शक्यता नाकरता येत नाही. करिता अशा नवीन वसाहतींचा तातडीने सर्वे करून त्या ठिकाणी वीजेचे पोल व ताराची व्यवस्था करून देण्यात यावी. जालना शहरात नुकत्याच रस्त्यावर आलेल्या विजेच्या खांबावर अपघात होऊन एका पोलीस कर्मचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला असून यास खरंतर महावितरण **पान २ वर**

# वादळी वाऱ्यासह पावसाचा तडाखा पिकांचे अतोनात नुकसान

### सोनुनकरवाडी येथील शेतकऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन



**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील सोनुनकरवाडी परिसरात वादळी वारा व पावसामुळे शेत पीकांचे अतोनात नुकसान झाले आहे. नुकसान भरपाई मि ळावी याकरीता परिसरातील रहिवाश्यांनी तहसिलदारांना निवेदन दिले आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, शुक्रवार (दि २३) रोजी सायंकाळच्या वेळेस अचानक आलेल्या वादळी वारा व पावसामुळे झालेल्या नुकसान झाले आहे. या नुकसानीची भरपाई देण्यात यावी. पांगरी बु. शिवारातील शेत गट नं. ७८,१८०,१३८, १७७, १४४,१०६, १७८,१४२,११५,१३४ म ध्ये जमीनी असून दिनांक २३ ऑगस्ट शुक्रवार रोजी सायंकाळच्या वेळेस वादळी वाऱ्यासह जोरात पाऊस झाला यामध्ये पावसापेक्षा अतिशय जोरात वादळी वारे होते त्या वाऱ्यामुळे शेतातील कापुस या पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.


कापुस हे पिक सध्या ३ ते ५ फुटा पर्यंत उंच झाले होते. त्यापैंकी बहतांश कापसाला म ोठ्या प्रमाणात फुल लागून बोंड लागली होती. गत वर्षीपेक्षा या वर्षी कापुस पिक हे जोरात होते. परंतू दिनांक २३ ऑगस्ट रोजी सायंकाळच्या वादळी वाऱ्यामध्ये कापसाची झाडे उपटून खाली **पान २ वर**

# आर्थिक दुर्बल घटकातील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांसाठी जेईएफ शिष्यवृत्ती योजना

### गत तीन वर्षात ६०० विद्यार्थ्यांना ८५ लाखाची शिष्यवृत्ती प्रदान

**जालना । प्रतिनिधी -** जालना एज्युकेशन फाउंडेशनतर्फे जालन्यातील दानशूर व्यक्ती आणि संस्था यांच्या माध्यम ातून आर्थिक दुर्बल घटकातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. गत तीन वर्षात ६०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना ८५ लाख रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आलेली आहे. यावर्षीही पॉलिटेक्निक, एमबीबीएस, इंजीनियरिंग, एम. टेक जालना आयसीटी, सीए फाउंडेशन, सीए आयपीसीसी, सीए फायनल, सीएस एक्झिक्यूटिव्ह, सीएस प्रोफ ेशनल, बी. फार्मसी, बीएस्सी नर्सिंग, बीएस्सी ग्री या १२ अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असून, सन २०२४-२५ मध्ये वर्षात प्रथम वर्षांत प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांनी २० सप्टेंबर २०२४ पर्यंत ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी आणि अध्यक्ष सुनील रायठठ्ठा यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखाच्या आत असावे. त्याचे दहावी किंवा बारावी शिक्षण जालना जिल्ह्यातच झालेले असावे, उच्च पदवी, पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचाच शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाणार आहे. प्राप्त अर्जाच्या छाननीनंतर निकषात बसणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांचे जेईएफ टीम त्यांच्या घरी जाऊन आर्थिक परिस्थितीबाबतचे सर्वे क्षण करेल. त्यानंतर प्रत्यक्ष मुलाखती घेऊन अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल. दानशूर व्यक्ती आणि संस्थांच्या लोकसहभागातून राबवली जाणारी महाराष्ट्रातील जिल्हा पातळीवरील सर्वात मोठी शिष्यवृत्ती योजना आहे. पात्रता आणि निकषाद्वारे विद्यार्थ्यांची निवड केली जाते. त्यानुसार एमबीबीएससाठी नीट रँकिंगद्वारे शासकीय महाविद्यालयात प्रवेश आणि बारावीच्या परीक्षेत **पान २ वर**




लाड गवळी समाजातर्फे गोकुळाष्टमीनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दहीहंडी साजरी करण्यात आली व प्रत्येक चौकात दहीहंडी फोडण्यात आली. यावेळी राम लाल सतकर, आनंद लुंगे, गणेश दशरथ सुपारकर, कन्हैयालाल अवघड, मनोज लाड, गणेश सुपारकर, बद्रीनाथ सुपारकर, अनिल अवघड, करण लुंगे यांच्यासह गोविंदा पथकाची उपस्थिती होती. (छायाचित्र - किरण खानापुरे)

# संपादकीय

## नंदनवनात रंगणार लोकशाहीचा उत्सव

जम्मू काश्मीरला विशेष अधिकार देणारे ३७० वे कलम हटवल्या नंतर जम्मू काश्मीर मध्ये पहिल्यांदाच निवडणुका होणार आहे. जम्मू काश्मीर मध्ये विधानसभेच्या निवडणुका सप्टेंबर मध्ये होणार असून तशी घोषणा निवडणूक आयोगाने नुकतीच केली. या निवडणुकीची तयारी निवडणूक आयोगाने काही वर्षापासूनच सुरु केली होती. त्यासाठी निवडणूक आयोगाने जम्मू काश्मीर मधील मतदार संघाची पुनर्रचना केली होती. मतदार संघाची पुनर्रचना करण्यासाठी माजी न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. समितीत तात्कालिन मुख्य निवडणूक आयुक्त सुशील चंद्र व उपायुक्त चंद्रभूषण कुमार हे सदस्य होते. या समितीने आपला अहवाल सादर केल्यानंतर २०२२ सालीच जम्मू काश्मीर विधानसभा आणि लोकसभेच्या नवीन मतदार संघाची अधिसूचना जाहीर झाली होती. या अधिसूचनेनुसार जम्मू काश्मीर राज्यात एकूण ९० विधानसभा मतदार संघ असून त्यातील ४३ मतदारसंघ जम्मू क्षेत्रात तर ४७ मतदारसंघ काश्मीर क्षेत्रात आहे. मतदार संघाची पुनर्रचना झाल्याने जम्मू काश्मीरमधील अनेक नेत्यांना नवीन मतदार संघ शोधण्याची वेळ आली आहे कारण काहींचा मतदार संघ गायब झाला आहे तर काहींचा मतदारसंघ आरक्षित झाला आहे. मतदार संघाची पुनर्रचना झाल्यावर विरोधकांनी त्यावर टीकाही केली होती कारण पुनर्रचनेनंतर जम्मू क्षेत्रातील मतदारसंघात वाढ झाली आहे. जम्मू क्षेत्रात हिंदू धर्मीय लोकांची संख्या जास्त आहे. हिंदूंची मते मिळवण्यासाठीच भाजपने या क्षेत्रात मतदारसंघ वाढवले आहेत असा आरोप करण्यात आला मात्र निवडणूक आयोगाने त्याची दखल घेतली नाही. आता निवडणूक घोषित झाल्यावर राजकीय पक्षांनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. या निवडणुकीसाठी काँग्रेस आणि फारुख अब्दुल्ला यांच्या नॅशनल कॉन्फरन्सने आघाडी केली आहे. या आघाडीमुळे जम्मू काश्मीरमध्ये सत्ता स्थापन करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भाजपपुढे मोठे आव्हान उभे राहिले आहे. भाजपने अद्याप कोणाशी आघाडी केली नसली तरी गुलाम नबी आझाद यांच्या पक्षाशी त्यांची युती होऊ शकते. महेबुबा मुफ्ती यांचा पिपिल्स डेमोक्रेटिक पक्ष हा देखील तेथील एक महत्वाचा पक्ष आहे. तो पक्ष कोणती भूमिका घेतो यावरही बरेच काही अवलंबून आहे. या पक्षाचे आणि नॅशनल कॉन्फरन्सशी विळ्या भोपळ्याचे नाते आहे म्हणून हा पक्ष काँग्रेस आघाडीत अद्याप सामील झाला नाही मात्र या पक्षाचे भाजपशीही पटत नाही. या पक्षाच्या प्रमुख मेहबूबा मुफ्ती यांना केंद्र सरकारने नजरकैदेत ठेवल्याचा आरोप या पक्षाने काही दिवसांपूर्वी केला होता त्यामुळे ते भाजपला रोखण्यासाठी काँग्रेस आघाडीत सामील झाला तर आश्चर्य वाटायला नको. याशिवाय आणखी काही छोटे मोठे पक्ष निवडणुकीत उतरू शकतात एकूणच काय तर आगामी महिनाभर नंदनवनात निवडणुकांचे वातावरण असणार आहे. जम्मू काश्मीर मध्ये लोकसभा निवडणुका शांततेत पार पडल्या विशेष म्हणजे मतदार मतदान करण्यासाठी मोठ्या संख्येने घराबाहेर पडले होते. लोकसभे प्रमाणेच विधानसभेतही मतदार भरभरून मतदान करतील आणि लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होतील असा विश्वास निवडणूक आयोगाने व्यक्त केला आहे. असे असले तरी मागील काही दिवसात काश्मीर खोऱ्यात दहशतवाद्यांनी पुन्हा डोके वर काढले आहे त्यामुळे विधानसभा निवडणूक शांततेत पार पाडण्याचे मोठे आव्हान सुरक्षा यंत्रणेपुढे आहे. अर्थात आपली सुरक्षा यंत्रणा त्यासाठी सक्षम आहे हे ही तितकेच खरे त्यामुळे नंदनवनात पुन्हा एकदा लोकशाहीचा उत्सव रंगणार असून या उत्सवात मतदार उत्साहाने सहभागी होणार यात शंका नाही.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# एका कोवळ्या स्वातंत्र्यसैनिकाचे अनुभव!

रानोमाळ स्वच्छंद भ्रमंती करणारे निसर्गप्रेमी, शिकारी तसेच चित्रकार म्हणूनही त्यांची ख्याती आहे. चित्रकलेचे कसलेही औपचारिक शिक्षण नसताना त्यांनी ही कला प्राप्त केली जागतिक कीर्तीच्या चित्रकारांच्या चित्रशैलीचा रसिकतेने शोध घेतला. त्यांची अनेक सुंदर रेखाटने प्रसिद्ध झालेली आहेत. आकाशवाणीवर ते दीर्घकाळ सन १९५५-८५पर्यंत नोकरीत होते. त्यांच्या अनेक पुस्तकांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार लाभले. त्यांची थोडीशीच पण ज्ञानवर्धक माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या या संकलित लेखात अवश्य वाचा...

व्यंकटेश दिगंबर माडगूळकर हे एक श्रेष्ठ मराठी कथाकार आणि कादंबरीकार होते. त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील माडगूळ येथे दि.६ जुलै १९२७ रोजी झाला. औपचारिक शिक्षण फारसे मॅट्रिकपर्यंतही झाले नाही. तथापि स्वप्रयत्नाने वाङ्मयाचा व्यासंग केला. इंग्रजी शिकून पाश्चात्त्य साहित्याचेही वाचन केले. विख्यात साहित्यिक ग.दि.माडगूळकर ह्यांचे व्यंकटेश हे धाकटे बंधू. आपल्या वडील बंधूंच्या पाठोपाठ तेही साहित्यसृष्टीत आले आणि आपल्या प्रतिभेचा एक स्वतंत्र ठसा त्यांनी तेथे उमटविला. आरंभी काही काळ पत्रकारी केल्यानंतर ते १९५० च्या सुमारास मुंबईस आले आणि मराठी चित्रसृष्टीत पटकथालेखन करू लागले. तत्पूर्वी माणदेशी माणसे-१९४९ हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध झाला होता. त्यातील व्यक्तिरेखांतून त्यांनी ग्रामीण माणसाचे जे अस्सल आणि जिवंत दर्शन घडविले, ते तोवरच्या मराठी साहित्याला अनोखे होते. अद्भुतता, स्वप्नरंजन, कल्पनारम्यता यांच्या पकडीतून सुटलेल्या वास्तववादी ग्रामीण साहित्यकृतींचा आरंभ त्यांच्या या कथासंग्रहापासून झाला. त्यानंतर गावाकडच्या गोष्टी-१९५१, हस्ताचा पाऊस-१९५३, सीताराम एकनाथ-१९५१, काळी आई-१९५४, जांभळाचे दिवस-१९५७ यासारखे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. त्यांच्या कथांचे अनुवाद डॅनिश, जर्मन, जपानी आणि रशियन अशा विविध जगातिक भाषांत झालेले आहेत.

ग्रामीण कथेप्रमाणेच ग्रामीण कादंबरीच्या संदर्भातही त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. बनगरवाडी-१९५५, वावटळ-१९६४, पुढचं पाऊल-१९५०, कोवळं दिवस-१९७९, करुणाष्टक-१९८२ आणि सत्तांतर-१९८२ या त्यांच्या कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. बनगरवाडीतून व्यंकटेश माडगूळकरांची प्रयोगशीलता प्रत्ययास येते. रूढ अर्थाने या कादंबरीला कथानक नाही. बनगरवाडी नावाच्या या लहानशा गावातील सामूहिक जीवनाचे विविधांगी चित्रण तीत केलेले आहे. तेथील उजाड व निष्पर्ण सृष्टी, तेथील कंगालपणा, दुष्काळ, तेथील सण, उत्सव, रूढी, परंपरा, श्रद्धा, संकेत तेथील रहिवाशांच्या जीवनांतील चढउतार यांना जिवंत शब्दरूप तेथे लाभले आहे. येथे कोणी विशिष्ट व्यक्ती नायक वा नायिका नाही, तर बनगरवाडी या गावालाच नायकत्व देण्यात आलेले आहे. इंग्रजी व डॅनिश या भाषांतून ही कादंबरी अनुवादिली गेली आहे. (इंग्रजी-द व्हिलेज हॅड नो वॉल्स -डॅनिश.). वावटळ, करुणाष्टक आणि कोवळे दिवस या त्यांच्या कादंबऱ्या आत्मचरित्रपर आहेत. गांधीवधानंतर झालेल्या भीषण दंगली, लुटालूट आणि जाळपोळ यांनी ब्राह्मण समाजावर झालेल्या आघाताची वावटळ ही कहाणी होय. विंड्स ऑफ फायर या नावाने तिचे इंग्रजी भाषांतर झाले आहे. करुणाष्टकात दारिद्र्याने ग्रासलेली आठ मुलांची दुःखी आई त्यांनी उभी केली. व्यंकटेश माडगूळकर हे १९४२च्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेले होते. कोवळे दिवस या कादंबरीत अशाच एका कोवळ्या स्वातंत्र्यसैनिकाचे अनुभव आहेत. पुढचं पाऊल ही त्यांच्याच एका कथेवरून त्यांनी लिहिलेली कादंबरी. एका दलित कलावंताच्या जीवनावरील ह्या कादंबरीत त्याच्यावरील अन्याय, त्याबद्दलची त्याची चीड आणि पुढंच पाऊल टाकून प्रगतीचा मार्ग चोखाळण्याची दलित मनाची धडपड दाखविली आहे. सत्तांतर मध्ये आरंभापासून अखेरपर्यंत वानरांच्या टोळ्यांचे सूक्ष्म आणि मार्मिक चित्रण आहे. प्रत्येक टोळीचे जंगलातील क्षेत्र, टोळ्यांची परस्परांच्या हद्दीत चालणारी घूसखोरी, त्यांचे संघर्ष नरानरांतले, माद्यामाद्यांतले सर्व वानरांची जंगलातील हिंस्त्र प्राण्यांपासून आणि शिकाऱ्यांपासून स्वतःच्या टोळीचा बचाव करण्याची धडपड, टोळीचे नायकत्व आणि टोळीतील माद्या मिळविण्यासाठी वानरांना कराव्या लागणाऱ्या हाणामाऱ्या यांचे विलक्षण परिणामकारक दर्शन या छोट्याशा कादंबरीत आहे. सत्तांतर म्हणजे टोळीचा एक नायक जाऊन तेथे दुसरा नायक येणे. हे कसे घडते, हे या कादंबरीचे कथानक होय. तथापि वानरांच्या या कथेतून मानवी जगातील वृत्तिप्रवृत्तींचीही प्रतीकात्मक पातळीवर प्रत्यय येत राहतो. काळाप्रमाणे संघर्षही सतत वाहतच असतो जेव्हा एखादी जात धोक्यात येते, बाहेरूक परकं कुणी येतं आणि बंदिस्त टोळीत घुसू पाहतं, तेव्हा संघर्ष उतू जातो .. संघर्ष पेटला, की शस्त्रास्त्रं वापरली जातात. ज्यांना शस्त्रास्त्रं माहीतच नसतात, ते सुळे, नखं वापरतात. संघर्ष सर्वत्र भरून राहिलेला असतो, ही कादंबरीतली काही वाक्ये फार अर्थपूर्ण आहेत.

त्यांनी नाटकेही लिहिली- तू वेडा कुंभार, सती, पति गेले गं काठेवाडी ही त्यांतील काही विशेष उल्लेखनीय होत. कुनाचा कुनाला मेळ न्हाई आणि बिनबियांचे झाड ही त्यांनी लिहिलेली लोकनाट्येही गाजली. त्यांनी लिहिलेल्या चित्रपटांत पुढचं पाऊल- कथा-१९५०, वंशाचा दिवा-कथा-१९५०, जशास तसे-कथा-१९५१, सांगत्ये ऐका-पटकथा, संवाद-१९५९, रंगपंचमी-पटकथा, संवाद-१९६१ यांचा समावेश होतो. नागझिरा-१९७९, पांढरी मेंढरे, हिरवी कुरणे-१९७९, पांढ्यावर काळे-१९७१, रानमेवा-१९७८, चित्रे आणि चरित्रे-१९८३ ही त्यांची पुस्तके ललित गद्य या प्रकारातली.

रानोमाळ स्वच्छंद भ्रमंती करणारे निसर्गप्रेमी, शिकारी तसेच चित्रकार म्हणूनही त्यांची ख्याती आहे. चित्रकलेचे कसलेही औपचारिक शिक्षण नसताना त्यांनी ही कला प्राप्त केली जागतिक कीर्तीच्या चित्रकारांच्या चित्रशैलीचा रसिकतेने शोध घेतला. त्यांची अनेक सुंदर रेखाटने प्रसिद्ध झालेली आहेत. आकाशवाणीवर ते दीर्घकाळ सन १९५५-८५पर्यंत नोकरीत होते. त्यांच्या अनेक पुस्तकांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार लाभले. त्यांत गावाकडील गोष्टी, काळी आई यांसारखे कथासंग्रह, बनगरवाडी ही कादंबरी आणि सती ही नाट्यकृती यांचा अंतर्भाव होतो. सत्तांतरला तर १९८३चे साहित्य अकादेमीचे पारितोषिक प्राप्त झाले. १९८३मध्ये आंबेजोगाई येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना देऊन त्यांच्या साहित्यसेवेचा गौरव करण्यात आला. अशा या साहित्यप्रेमी व्यंकटेश माडगूळकर यांनी दि.२८ ऑगस्ट २००१ रोजी जगाचा कायमचा निरोप घेतला. व्यंकटेश माडगूळकरांना व त्यांच्या साहित्यप्रतिभेला स्मृतिदिनी कोटी कोटी विनम्र अभिवादन !

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे,**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली,**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

## समर्थनगरमध्ये अतिक्रमणावर उभारलेली दोन मजली इमारत पाडली

### महानगर पालिकेची कारवाई



**जालना | प्रतिनिधी -** जालन्यात अतिक्रमणावर उभारलेली दोन मजली इमारत महानगर पालिकेनं जमिनोदोस्त केलीये. शहरातील समर्थनगरमध्ये ले आऊट मधील ओपन स्पेस वर एका व्यक्तीनं अतिक्रमण करून दोन मजली इमारत बांधली होती. त्यानंतर त्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी महानगर पालिकेला केली होती. आज दि.२७ मंगळवार रोजी दुपारी दोन वा. च्या सुमारास महानगर पालिकेनं पोलिसांचा रितसर बंदोबस्त घेवून या दोन मजली इमारतीवर कारवाई केली. जेसीबीच्या सहायानं पालिकेनं या अनधिकृत ईमारती बांधकाम पाडत जमिदोस्त केली आहे. बनसोडे नावाच्या व्यक्तीनं हे बांधकाम केलं असल्याची माहिती आहे. दरम्याम नागरिकांनी कुठेही अतिक्रमण करून अशा पद्धतीनं बांधकाम करू नये अन्यथा त्यावर कारवाई करण्यात येईल अशी माहिती पालिका कर्मचार्यांनी दिली आहे. यावेळी महानगरपालिकेचे अधिकारी कर्मचारी तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

## डॉल्फिन इंग्लिश स्कूल मध्ये गोकुळाष्टमी उत्साहात साजरी



**परतूर | प्रतिनिधी -** परतुर तालुक्यातील वाटुर फाटा येथील डॉल्फिन इंग्लिश स्कूलमध्ये गोकुळ अष्टमी निमित्त दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी शाळेतील लहान लहान मुलांनी श्रीकृष्ण गोपिका यांच्या वेशभूषा धारण करून दहीहंडी च मनमुराद आनंद लुटला. विद्यार्थ्यांनी थर रचून दहीहंडी फोडली.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका श्रीमती कुकडे विद्या.श्रीमती सय्यद नसरीन. श्रीमती पाटील भाग्यश्री. श्रीमती उबाळे वंदना .श्रीमती काळे साधना. श्रीमती वायाळ शारदा. शेळके गजानन यांनी परिश्रम घेतले.

## पान १ वरुन

### सणासुदीच्या काळात ...

जबाबदार आहे.वेळीच हे विजेचे खांब. हटविण्यात आले असते तर ही घटना घडली नसती .आता तातडीने असे रस्त्यावर आलेली विजेचे खांब हटविण्यात यावेत. जनतेला वीज विलापोटी महावितरण कडून मोठ्या प्रमाणात त्रास असून आवाच्या सव्वा बीलं दिली जाते.अशा तक्रारी मोठ्या प्रमाणावर आहेत.तक्रार करूनही बिलांची दुरुस्ती वेळ वेळेवर होत नाही त्यामुळे नागरिकांना प्रचंड भुर्दंड सोसावा लागतो. याबाबतीत तातडीने सुसूत्रता आणावी. जळालेले विजेचे ट्रान्सफार्मर तातडीने भरून देण्यात यावेत जेणेकरून सण उत्सवाच्या काळात वीज पुरवठा सुरळीत राहील. नव्याने मंजूर असलेले सामनगाव, गुंडेवाडी, खरपुडी, येथील ३३ के व्ही. केंद्राचे काम तातडीने हाती घेण्यात यावे. शेतकऱ्यांच्या सौर पंपाचे कामे संबंधी एजन्सी करण्यात टाळाटाळ करतात त्यांना तातडीने सूचना करून कामे करण्याचे आदेश द्यावेत. अशा स्वरूपाच्या समस्येचा पाढाच अर्जुनराव खोतकर यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यासमोर मांडला यामध्ये तातडीने सुधारणा करावी व नागरिकांची गैरसोय दूर करावी अशा सूचना त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केल्या.

यावेळी शिवसेनेचे विभाग प्रमुख दीपक राठोड, मनोज लाखोले, किशोर शिंदे,घोडे पाटील,शिवसिंग तिलवारवाले दिनेश भगत ,देवेंद्र बुंदले,संजय शर्मा, यांच्या सहर व ग्रामीण भागातील शेतकरी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वादळी वाऱ्यासह ...

पडली आहे, फुले व बोंड खाली पडले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांवर अस्मानी संकट उभे राहीले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले असून नुकसानसंदर्भातील काही छायाचित्रे सादर करण्यात आली आहेत. या गंभीर विषयाकडे स्वतः प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई मिळण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव सादर करावा अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर ज्ञानेश्वर सोनुनकर, सुभाषराव हरणावळ, आसाराम सोनुनकर, गजानन सोनुनकर, रामभाऊ सोनुनकर, सुरेश सोनुनकर आदी शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

### आर्थिक दुर्बल ...

किमान ६० टक्के गुण, इंजिनिअरिंगसाठी बारावीच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण आणि एमएच- सीइटी रँकिंग १० हजारापर्यंत अथवा जेईई-मेन रँकिंग ५० हजारापर्यंत, सीए फाउंडेशन आणि सीए आयपीपीसीसाठी बारावी परीक्षेत किमान ८५ टक्के गुण, बी. फार्मसीसाठी बारावीच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण आणि एमएच सीईटी फार्मसी रँकिंग २ हजारपर्यंत, पॉलिटेक्निकसाठी दहावीच्या परीक्षेत किमान ८० टक्के गुण आणि शासकीय पॉलिटेक्निक महाविद्यालयात प्रवेश, बी. एस्सी नर्सिंगसाठी बारावीत किमान ६० टक्के गुण आणि नीट रँकिंगद्वारे प्रवेश अशी पात्रता असलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज करू शकतील.

या योजनेसाठी https://rb.gy/vxxm3 या लिंकवर २० सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज भरावयाचे आहेत. अधिक माहितीसाठी व्यंकटेशनगरमधील जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या कार्यालयात अथवा रुक्मिणीकांत दीक्षित (९४०४६०७५७५) यांच्याशी संपर्क साधावा.

जिल्ह्यातील आर्थिक दुर्बल घटकातील गरजू होतकरू विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जालना एज्युकेशन फाऊंडेशनचे प्रा. सुरेश लाहोटी, सुनिलभाई रायठठ्ठा, सुनील गोयल, डॉ. हितेश रायठठ्ठा, दिलीप कुलकर्णी, सुरेश कुलकर्णी-केसापूरकर, गोविंद काबरा, प्रा. ओमप्रकाश झांजरी, सपना गोयल, परेश रायठठ्ठा, प्रा. स्वप्निल सारडा, दिलीप केंद्रे यांनी केले आहे.

## ड्रोन कॅमेऱ्यांच्या घिरट्यांमुळे नागरिक भयभीत; तपास लावण्याची मागणी

**घनसावंगी | प्रतिनिधी -** घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगाव,देवी दहेगाव, पिंपरखेड बु.अरगडेगव्हाण, श्रीपत धामणगाव,गुंज, मुर्ती,नाथनगर,विरेगव्हाण तांडा,कोठी,मुद्रेगाव आदी गावात मागील सलग दोन ते तीन दिवसांपासून रात्री- बेरात्रीच्या सुमारास ड्रोन कॅमेरा घिरट्या घालत आहेत. यामुळे नागरिकांत भीतीचे वातावरण पसरलेले असून नागरिकांच्या अक्षरशः झोपा उडालेल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना रात्रभर जागर करावा लागत आहे.



हे ड्रोन कोण उडवत आहे? व कशासाठी उडवत आहे? त्यामागचा हेतू काय आहे ?असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.याचा पोलिस व इतर प्रशासनास अद्यापही अधिकृतपणे सुगावा लागलेला नाही. रात्रीच्या सुमारास सलग दोन ते तीन वेळेस ड्रोन कॅमेरा घिरट्या घालत असल्याने नागरिकांत एकाप्रकारे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान घनसावंगी तालुक्यातील शहरांसह अनेक ग्रामीण भागात मागील सलग दोन ते तीन दिवसांपासून ड्रोन कॅमेरा घिरट्या घालत असल्याचे चित्र दिसून येत आहे.रात्रीच्या सुमारास काही वेळ घिरट्या घालून संबंधित ड्रोन हे गायब होत असल्याचे प्रकार काही दिवसांपासून समोर येत आहे.पोलिस व प्रशासनाने रात्रीची गस्त घालून संबंधित ड्रोन कॅमेरा चालविणाऱ्यांवर तातडीने कारवाई करून लवकर तपास लावून संबंधितावर कारवाई करण्याची मागणी सर्वसामान्य नागरिकांतून होत आहे.
यासंदर्भात नुकतीच हिकमत उढाण यांनी देखील जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली असून ड्रोन कॅमेऱ्यांबाबत चौकशीची मागणी केली आहे. घनसावंगी पंचायत समितीचे गटनेता अनिरुद्ध शिंदे यांनीही यासंदर्भात पोलीस प्रशासन व तहसीलदार यांना निवेदन दिले असून या प्रकाराची सखोल चौकशी करुन संबंधीतांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

कुंभार पिंपळगावचे पोलीस उपनिरीक्षक ए. एन. खरात यांनी नागरिकांना घाबरुन न जाता पोलीसांशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. श्री खरात म्हणाले की, पोलीस चौकीच्या हद्दीत असा काही प्रकार घडल्यास तातडीने पोलीसांशी संपर्क साधावा. नुकतेच पोलीस चौकीला नवीन वाहन मिळालेले आहे. त्यामुळे ग्रामीण भागात लवकरच पोलीसांची पेट्रोलींग नियमित सुरु राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# श्री तुळजाभवानी मंदिर अपहारप्रकरणी उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे तात्काळ कारवाई करावी; हिंदु जनजागृती समितीची मागणी

**धाराशिव । प्रतिनिधी -** श्री तुळजाभवानी मंदिर अपहारप्रकरणी गुन्हे अन्वेषण विभाग, जिल्हा पोलीस प्रमुख श्री. शंकर केंगार यांचा २२ सप्टेंबर २०१७ चा अहवाल मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठात सादर करण्यात आला. त्यानुसार उच्च न्यायालयाने मंदिरात ८.५ कोटीचा अपहार केल्याप्रकरणी ९ मे २०२४ दिवशी संबंधित १६ आरोपींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत; मात्र या आदेशाचे अद्यापही पालन झालेले नसल्यामुळे हिंदु जनजागृती समितीने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठात अवमान याचिका प्रविष्ट केलेली आहे. मा. न्यायालयाच्या आदेशानुसार तात्काळ फौजदारी गुन्हे नोंद करण्याची मागणी हिंदु जनजागृती समितीने एका निवेदनाद्वारे धाराशिव पोलीस अधीक्षक संजय जाधव यांच्याकडे केली आहे. या वेळी हिंदु जनजागृती समितीचे श्री. विनोद रसाळ, श्रीतुळजाभवानी पुजारी मंडळाचे माजी अध्यक्ष श्री. किशोर गंगणे, अधिवक्ता शिरीष कुलकर्णी आणि पुजारी श्री अमित कदम इत्यादी उपस्थित होते.



या अपहारप्रकरणी दोन स्वतंत्र चौकशी अहवाल न्यायालयासमोर ठेवण्यात आले. त्यापैकी पोलीस प्रमुख लता फड यांनी सादर केलेल्या अहवालात सर्व आरोपीना निर्दोष मुक्त करण्यात आले होते. हा अहवाल फेटाळण्यात आला असून शंकर केंगार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मा. उच्च न्यायालयाने सर्व १६ आरोपींवर गुन्हे नोंदवण्याचे आदेश दिले. हा आदेश देऊन ३ मास उलटले असून अद्याप संबंधितांवर फौजदारी गुन्ह्यांची नोंद झालेली नाही. त्यामुळे अधिक वेळ न दवडता न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. या वेळी अधीक्षक श्री. संजय जाधव म्हणाले की, मा. उच्च न्यायालयाने जिल्हाधिकार्‍यांना कारवाई करण्याचा आदेश दिला आहे. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी यांच्याकडून सूचना प्राप्त झाल्यावर तात्काळ कारवाई करण्यात येईल.



गोकुळाष्टमीच्या दिवशी मकाजी महाराज यांची पालखी... भजे गोविंदम भजे गोपाल मका जी महाराज दीनदयाल अशा जयघोषात मंदिरातून निघून कचेरी रोड -शनी मंदिर -गणपती गल्ली -शास्त्री मोहल्ला -आनंद स्वामी रोड व पुन्हा मंदिरात पालखीचा समारोप करण्यात आला.
(छायाचित्र -किरण खानापुरे)

# कोतवाल कृष्णा सोनवणे यांची अशीही कृतज्ञता; रक्ताने पत्र लिहून आ. चव्हाण यांचे मानले आभार

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर तालुक्यातील कोतवालाने रक्ताने पत्र लिहून आमदार मंगेश चव्हाण यांचे आभार मानले आहेत. राज्यभरातील



कोतवालांना एकसमान मानधन सुरु करण्यासाठी चाळीसगावचे आमदार चव्हाण यांनी आवाज उठविला होता. त्यासंदर्भात कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शुक्रवारी हे पत्र कोतवाल सोनवणे यांनी रक्ताने पत्र लिहून ते पोस्टाने आमदार चव्हाण यांना पाठवून दिले आहे.

कृष्णा सोनवणे हे परतूर तालुक्यातील वैजोडा या गावात कोतवाल आहेत. सरकारने काही दिवसांपूर्वी कोतवालांच्या मानधनात वाढ केली होती. ते करताना ज्येष्ठ आणि कनिष्ठ अशी

वर्गवारी केली होती. यात ज्येष्ठ कोतवालांना १५ हजार तर कनिष्ठ कोतवालांना ७५०० रुपये मानधन लागू केले होते. परंतु सर्वांना एकसमान १५ हजार रुपये मानधन देण्यात यावे, अशी कोतवालांची मागणी होती.या मागणीला पाठिंबा देत आमदार यांनी आवाज उठविला होता म्हणून त्यांचे आभार रक्ताने पत्र लिहून मानले.

संभाजीनगर बॉईज आणि नजीर भाई मित्र मंडळाचे आयोजन

# हिंदू मुस्लिम एकतेचा संदेश देणारा दहीहंडी महोत्सव



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील वार्ड क्रमांक एक संभाजीनगर येथे संभाजीनगर बॉईज आणि नजीर भाई मित्र मंडळ यांच्या वतीने सोमवार (दि २६) रोजी रात्री १० वाजता गोकुळाष्टमीनिमित्त दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते या महोत्सवाचे उद्घाटन शिंदे गटाचे नेते व माजी मंत्री अर्जुन खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले आहे. यावेळी नजीर भाई मित्र मंडळाचे सदस्य पदाधिकारी व संभाजीनगर बॉईज मित्रमंडळाचे सदस्य पदाधिकारी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने या दहीहंडी महोत्सवाला उपस्थित झाले होते कारण ही दहीहंडी महोत्सव म्हणजे शहरातील एक मानाची दहीहंडी म्हणून ओळखली जाते त्यामुळे या दहीहंडीची उत्सुकता संपूर्ण शहरात दरवर्षी सालाबादप्रमाणे असते आणि यावर्षीही मोठ्या उत्सवात हा दहीहंडी सोहळा आज जालना शहरांमध्ये पार पडला आहे.

यावेळी बोलताना माजी मंत्री अर्जुन खोतकर म्हणाले की नजीर भाई यांनी जो कार्यक्रम दहीहंडीचा आयोजित केला आहे, देशात राज्यात दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न काही राजकारणी करत आहे, त्याला हे सडेतोड उत्तर आहे कारण एका मुस्लिम बांधवान दहीहंडी महोत्सव आयोजित करणे ही आजच्या युगाची एक सर्वधर्मसमभावतेचा संदेश देणारी दहीहंडी आहे, दहीहंडीच्या माध्यमातून सर्व द्वेष प्रत्येकाच्या मनातून निघून जावो आणि सर्व नागरिक गुण्या-गोविंदाने नांदो हीच अपेक्षा या दहीहंडीच्या माध्यमातून मी करतो. हिंदू असो का मुस्लिम असो सर्वात अगोदर आपण एक माणूस आहे, आणि माणसाने माणसासारखेच वागायला पाहिजे ना की दोन समाजात तेढ निर्माण करणे आज जालना शहरातून संपूर्ण देशाला एक नवा संदेश या दहीहंडीच्या माध्यमातून देण्यात आला आहे असे मत यावेळी माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनी व्यक्त केले आहे.

# मुलींना स्वरक्षणाचे धडे देणार - ॲड. अश्विनी धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** नुकतेच बदलापूर व कलकत्ता येथील घटनेच्या पार्श्वभूमीवर मुलींना त्यांच्या हक्काबद्दल जाणीव करुन देण्यासोबत त्यांना स्वंरक्षणाचे धडे सुद्धा इन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझन तर्फे प्रशासनाचे सहभाग घेऊन दिले जाणार असल्याची माहिती क्लबच्या अध्यक्षा ॲड. अश्विन महेश धन्नावत तथा सचिव ॲड. पिंकी लड्डा यांनी दिली. मुलींना महत्वाचे फोन नंबर जसे पोलीस हेल्पलाईन, दामिनी पथकांचे संपर्क नंबर दिले जाईल तथा प्रत्येक शाळेत मुलींचीच एक समिती गठीत केली जाण्यासाठी प्रयत्न केले जाईल, ज्यामध्ये मुली त्यांच्या अडचणी या समितीच्या सदस्यांना मोकळ्यापणाने सांगु शकतील व या समितीच्या सदस्यांना विशेष प्रशिक्षण त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी क्लब मार्फत दिले जाईल. सध्या क्लब तर्फे चांगले व वाईट स्पर्श संदर्भात मार्गदर्शन सुरु आहे.

# भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हा महासचिवपदी राजकुमार दांडगे तर कोषाध्यपदी भास्कर घेवंदे यांची निवड

**जालना । प्रतिनिधी -** दी बुध्दिष्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभेचे जालना जिल्हाध्यक्ष संजय हेरकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करून जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यात आली. या बैठकीत भारतीय बौध्द महासभेच्या जालना जिल्हा महासचिव पदी राजकुमार दांडगे यांची तर कोषाध्यक्ष पदी भास्कर घेवंदे यांची निवड करण्यात आली.

जालना शहरातील अंबड चौफुली येथील शासकीय विश्रामगहात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ही कार्यकारीणी जाहिर करण्यात आली. यावेळी उर्वरीत कार्यकारीणीमध्ये सचिव पदी किरण सोनवणे, उपाध्यक्ष माधूरी मोरे, राजेंद्र अंभोरे, सहसचिव चंद्रकांत दाभाडे, संघटकपदी सुनिल जाधव, राजेंद्र पवार, नितीन निसर्गन, कांताबाई रत्नपारखे, ज्ञानेश्वर डांगे, संस्कार प्रमुख पदी गणपत भद्रे, प्रवक्ता राहुल भदर्गे, प्रसिध्दी प्रमुख म्हणून अच्युत मोरे यांची निवड



करण्यात आली.

यावेळी महिला विंग मराठवाडा अध्यक्ष छायामाई हिवाळे, महिला जिल्हा अध्यक्षा सुलेखा मनवर, भारती हेरकर, शशीकला पानपाटील, अनुराधा हेरकर, वंदना इंगळे, कविता मगरे, सत्वशिला आदमाने, लता सोनवणे, छाया मगरे, छाया बनकर, लिना हिवाळे यांची उपस्थिति होती.

या निवडीबद्दल दादाराव लहाने, प्रेमानंद मगरे, संजय व्हेवल, विजय हेरकर, बाळू बोर्डे आदींनी अभिनंदन केले.

# रामगिरी महाराज यांना अटक करा

## जमत ए इस्लामी हिंद ची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** राम गिरी महाराज यांनी प्रेषित मुहम्मद यांच्याबद्दल अपमानास्पद वक्तव्य आणि द्वेषपूर्ण भाषण केल्याने त्यांना अटक करावी अशी मागणी जालना येथील जमत ए इस्लामी हिंद ने आज दिनांक २७ मंगळवार रोजी चार वाजेच्या सुमारास जिल्हाधिकाऱ्यांमार्फत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलीय. नाशिक जिल्ह्यातील शाह पांचाळे गावात एका धार्मिक कार्यक्रमात धर्मगुरू रामगिरी महाराज यांनी प्रेषित मुहम्मद आणि इस्लाम धर्म यांच्या विरोधात आक्षेपार्ह टिप्पणी केलीय. या अपमानास्पद टिप्पण्यांमुळे मुस्लिमांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर,



साने गुरुजी, आचार्य विनोबा भावे यांची भूमी असलेल्या आपल्या महाराष्ट्र राज्याची ही संस्कृती नाहीये असं जमात ए इस्लामी हिंद ने म्हटलंय. राम गिरी महाराजांनी महाराष्ट्राची प्रतिष्ठा कमी केली असा आरोप करत जमात ए इस्लामी हिंद ने त्यांच्या या वक्तव्याचा निषेध केलाय. येवला (नाशिक), मुंब्रा (ठाणे), छत्रपती संभाजीनगर शहर आणि वैजापूर (छत्रपती संभाजीनगर), जालना येथे मुस्लिम समाजाने नोंदवलेल्या एफआयआर च्या आधारे आरोपीवर कठोर कारवाई आणि तात्काळ अटक करण्याची मागणी जमात-ए इस्लामी हिंदच्या पदाधिकाऱ्यांनी केलीय. आपल्या राज्यातील सांप्रदायिक सलोखा बिघडवू इच्छिणाऱ्या अशा लोकांविरुद्ध कडक उपाययोजना आणि तत्काळ कारवाई केल्याने आपल्या राज्यातील शांतता आणि जातीय सलोखा टिकून राहण्यास मदत होईल, असे मत जमात ए इस्लामी हिंदच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदन द्वारे व्यक्त केलंय.

यावेळी सचिव राष्ट्रवादी कांग्रेसचे खान एकबाल पाशा, जमीअतुल उल्मा हिंदचे सेक्रेटरी अय्यूब खान, जमात ए इस्लामी हिंदचे शहर अध्यक्ष शेख इस्माईल, जिल्हाधयक्ष चझग. शेख इब्राहिम, काज़ी गालेब, मोहम्मद मुश्ताक सर, रियाज अंसारी, अबरार ख़ान शेख अहमद, सुभानी सह मुस्लिम बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# दत्ता खंदारे 'आदर्श संपादक प्रजासत्ताक अमृत गौरव' पुरस्काराने सन्मानित!



**मुंबई । प्रतिनिधी -** प्रजासत्ताक अमृत गौरव पुरस्कार समिती, महाराष्ट्र राज्य आयोजित प्रजासत्ताक अमृत गौरव पुरस्कार सोहळा २०२४ नुकताच मुबंईत वांद्रे येथील नॅशनल लायब्ररी सभागृह मध्ये डॉ. बाळासाहेब तोरस्कर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.यावेळी मुख्य संयोजन समितीचे प्रा. नागेश हुलावळे (संस्थापक, अध्यक्ष वर्ल्ड व्हिजन ),उदघाटक डॉ. ख र. माळवे (उपाध्यक्ष महाराष्ट्र पर्यटन व कला सांस्कृतिक महोत्सव समिती ), डॉ.सुकृत खांडेकर (संपदाक दैनिक प्रहार ),रमेश पाटील (लेखन अन मी साहित्य समूह ), प्रमोद सूर्यवंशी (साप्ताहिक आम्ही मुंबईकर ), योगेश हरणे (काव्ययोग काव्यसंस्था पूणे ), सर्जेराव पाटील (बी.पी.ई सोसायटी बांद्रा ),डॉ. डेरीक एंजल्स (नासा शास्त्रज्ञ),प्रमोद महाडिक (सचिव नॅशनल लायब्ररी ),पद्मश्री डॉ. जी. डी यादव (अध्यक्ष राष्ट्रीय विज्ञान संस्था भारत सरकार ) आदी पाहूणे उपस्थित होते. यावेळी सामाजिक, शैक्षणिक, कला, साहित्य, पत्रकारिता आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये गेल्या ३० वर्षांपासून विविध दैनिकातून लेखन करणारे तसेच साप्ताहिक भगवे वादळचे संपादक दत्ता खंदारे यांना प्रमुख मान्यवर व्यक्तीच्या हस्ते 'आदर्श संपादक प्रजासत्ताक अमृत गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दत्ता खंदारे यांना आजवर ५० हून अधिक पुरस्काराने विविध संस्था, संघटना यांनी गौरविले आहे.त्यांना 'आदर्श संपादक प्रजासत्ताक अमृत गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने विविध क्षेत्रातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# २ सप्टेंबर रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजन करण्यात येते. तरी जालना येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दि. २ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती उपजिल्हाधिकारी (सामान्य), जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. तसेच लोकशाही दिनात द्यावयाच्या अर्जाचा विहित नमुना https://jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

शेतकऱ्यांना सतीश घाटगे यांनी दिला हक्काचा रोजगार

## यावल पिंपरीच्या शेतकऱ्यांना ३५ टक्के अनुदानावर गाड्यांचे वाटप



**अंबड । प्रतिनिधी -** सुशिक्षित बेरोजगारांना तसेच शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या समृध्द करण्यासाठी सतीश घाटगे यांच्या प्रयत्नातून शेतमाल वाहतुकीचा व्यवसाय करण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून वाहने उपलब्ध करून देण्यात येत आहे.यावल पिंपरी येथील कारभारी उगले व यावल पिंपरी तांडा येथील शिवाजी राम राठोड यांना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून ३५ टक्के अनुदानावर शेतमाल वाहुतुकीच्या व्यवसायासाठी वाहने उपलब्ध करून देण्यात आली.

गेल्या सात महिन्यापासून हा कार्यक्रम घनसावंगी विधानसभा क्षेत्रात सतीश घाटगे यांच्या सहकार्यातून राबविल्या जात आहे. या कार्यक्रमातून आतापर्यंत ३० लाभार्थींना शेतमाल वाहतुकीचे वाहने मिळवून देण्यात आली आहे. या वाहनामुळे अनेक युवकांना हक्काचा रोजगार मिळाला आहे. यावेळी आनंद बामणे, गणेश टकले यांची उपस्थिती होती.

# शिवसेना शेतकरी सेनेच्या जिल्हा संघटकपदी डॉ. सुयोग कुलकर्णी

**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना शेतकरी सेनेच्या जिल्हा संघटकपदी प्रगतशील शेतकरी आणि बांबू लागवड चळवळीचे जिल्हा समन्वयक डॉ. सुयोग सुरेशराव कुलकर्णी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेनेचे उपनेते आणि माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी ही नियुक्ती केली आहे.

श्री. खोतकर यांच्या हस्ते डॉ. सुयोग कुलकर्णी यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, महानगरप्रमुख विष्णू पाचफुले, भरत मंत्री, योगेश शिंदे, शैलेश बजाज, राजू कोल्हे, दिगंबर पालवे, सरपंच राजेश प्रधान, माजी सरपंच राठोड, खरपूडी येथील दीपक हवाले, सुमित खंदारे आदींची उपस्थिती होती.

यावेळी श्री. खोतकर म्हणाले की, डॉ. सुयोग कुलकर्णी हे सन २०१२ पासून वैद्यकीय व्यवसाय सोडून शेती क्षेत्रात कार्यरत झाले आणि त्यांनी आधुनिक शेतीवर भर दिला. डाळिंब उत्पादक संघाचे विभागीय अध्यक्ष आणि राज्य सचिव म्हणून त्यांनी उत्कृष्ट जबाबदारी पार पाडलेली असून, शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक कार्यशाळा घेतलेल्या आहेत. याशिवाय गेल्या दोन वर्षापासून बांबू लागवड चळवळीच्या माध्यमातून त्यांनी बांबू लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रेरित केले आहे. डॉ. सुयोग कुलकर्णी यांनी कृषी क्षेत्रात केलेल्या बहुमूल्य कार्याची दखल घेऊन शिवसेना शेतकरी सेनेचे जिल्हा संघटक म्हणून डॉ. कुलकर्णी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना, शेतकरी सेना व युवासेना संघटन वाढीसाठी तसेच मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे विचार तळागाळापर्यंत पोहचवून पक्ष हिताचे काम आपल्याकडून पुढील काळात होईल, असे या नियुक्तीपत्रात श्री. खोतकर यांनी नमूद केले आहे.



या नियुक्तीबद्दल सुयोग कुलकर्णी यांचे..ड. हरिभाऊ झोल, ड. किशोर राऊत, ड. पिसुरे, ड. प्रदीप जाधव, ड. सुविध कुलकर्णी, ड. शरद कुलकर्णी, ड. प्रज्ञेश कुलकर्णी, ड. विलास राठोड, ड. अमोल कुलकर्णी, राजेश महाराज सामणगावकर, डॉ. प्रदीप हुशे, डॉ. आनंद बोरिवले, डॉ. मांटे, डॉ. दराडे यांचा शेतकरी आणि व्यापाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. यावेळी डॉ. सुयोग कुलकर्णी म्हणाले की, शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध व्हावे, यासाठी गेल्या दोन वर्षापासून जालना जिल्ह्यात पर्यावरणपूरक बांबू लागवड चळवळीला आपण प्राधान्य दिलेले असून, आजघडीला सुमारे ५०० हेक्टरवर बांबू लागवड झाली. पारंपारिक पिकाला बांबू लागवड हा शाश्वत उत्पन्न देणारा महत्त्वाचा पर्याय असल्याची आता शेतकऱ्यांना जाणीव होऊ लागली आहे. मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनीदेखील बांबूचा मनरेगा योजनेत समावेश केला असून, बांबू लागवडीसाठी हेक्टरी सात लाख रुपये एवढे अनुदान दिले जात आहे. शिवसेना शेतकरी सेनेचा जिल्हा संघटक या नात्याने मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि माजीमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना किसान सेनेच्या माध्यमातून बांबू लागवड चळवळ अधिक व्यापक प्रमाणात राबण्यासह पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही डॉ. सुयोग कुलकर्णी यांनी दिली.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.